आर.सी.सी. २१७/२०२३
सरकार वि. गणेश व इतर.
**निशाणी २६**

**<u>अभियोगपक्षातर्फे सा.क्र. ४ याची जबानी</u>**
**<u>मी याद्वारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करते की,</u>**

माझे नाव – मिना राजू वाघ, वय – ५७ वर्षे,
व्यवसाय – शेती, राहणार – वाघवाडी–टाकळी,
तालुका – अकोले, जिल्हा – अहमदनगर.

**<u>सरतपास अभियोगपक्षातर्फे विशेष सहायक सरकारी अभियोक्ता श्रीमती. एस. ए. भोसले यांच्या मार्फत</u> –**

१. घटना अंदाजे २ वर्षापुर्वी घडली होती. त्या दिवशी सकाळी १०:०० वाजता आरोपी हे आमच्या घरी वाघवाडी येथे आले होते. त्यावेळी आरोपी मला म्हणाले की, तुमच्या पतीला बोलवा. त्यानंतर मी माझ्या पतीला बोलाविण्याकरीता गेले. ते गर्दणी येथे गेले होते. ११:०० वाजता मी माझ्या पतीला घेवून घरी आले. त्यानंतर आरोपींनी आमचे बारे का फोडले असे विचारले. आम्ही त्यांना तुमचे बारे आम्ही फोडले नसल्याचे सांगितले. त्यानंतर आरोपींनी संजय यास हातापायवर, पाठीवर मारले. संजय हा माझा मुलगा आहे. माझे पती सोडवण्याकरीता गेले असता त्यांनी मला व माझ्या पतीला दम दिला की, आम्ही तुम्हाला पण मारू. त्यानंतर आम्ही घरी आलो. त्यानंतर आम्ही अकोले येथे पोलीस स्टेशनला आलो. त्यानंतर आम्ही घरी गेलो. त्यानंतर घरी जावून संजयला अकोले येथील सरकारी दवाखान्यात आणले. अकोले येथून त्यास नाशिक येथील सरकारी दवाखान्यात नेले. पोलीसांनी माझा जबाब नोंदवला होता. मी आरोपींना ओळखते. ते आजरोजी न्यायालयात हजर आहे.

**<u>उलटतपास आरोपींतर्फे विद्वान विधिज्ञ श्री. आर. डी. नवले यांच्या मार्फत</u> –**

२. माझे शिक्षण काहीही झालेले नाही. हे म्हणणे खरे आहे की,

**निशाणी २६**

माझा मुलगा संजय यास मानसिक आजार असल्यामुळे त्यास येरवाडा येथे पाठवले होते. हे म्हणणे खरे आहे की, गावातील बरेच लोक माझ्या मुलाच्या खोड्यांवरून आमच्याकडे तक्रार करत होते व आम्ही त्यास समजावून सांगत होतो. हे म्हणणे खरे आहे की, त्याच्या त्रासाला कंटाळून मी व माझ्या पतीने त्यास येरवाडा येथील दवाखान्यात नेले होते. हे म्हणणे खरे आहे की, त्यास दवाखान्यात आणले तरी तो परत तसेच करायचा.

३. हे म्हणणे खरे आहे की, आमच्या घरापासून गर्दणी येथे पायी जाण्याकरीता एक तास लागतो. मी माझ्या पतीला बोलावण्याकरीता पायी गेले होते. मला गर्दणी येथे जाण्याकरीता अर्धा एक तास लागला असेल. आम्ही गर्दणी वरून पायी आलो व आम्हाला येण्याकरीता अर्धा ते एक तास लागला असेल. मी गर्दणीला जावून येईपर्यंत माझा मुलगा हा घरीच होता. मी गर्दणीला आले त्यावेळी आरोपी हे त्यांच्या घरी गेले होते. टाकळी वरून अकोलेला येण्याकरीता अर्धा तास लागतो. आम्ही अकोले येथे ०४:०० वाजता आलो होतो. पोलीसांनी माझा जबाब दोन–तीन दिवसांनी नोंदवला होता. माझ्या पतीने सदर घटनेबाबत दुस–या दिवशी फिर्याद दिली.

४. हे म्हणणे खरे आहे की, माझे पती हे आजरोजी माझ्या सोबत आले आहेत. हे म्हणणे खरे आहे की, आज काय जबाब द्यायचा याबाबत माझे व माझ्या पतीचे बोलणे झाले. हे म्हणणे खरे आहे की, त्याप्रमाणे मी आजरोजी जबाब देत आहे. आरोपी १०:०० वाजता घरी आले होते त्यावेळी माझा मुलगा घरीच होता. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या मुलाने मोटारसायकल चोरली याबाबत त्याचे विरूध्द केस दाखल झाली होती. माझे मुलावर मोटारसायकल चोरीचा आरोपी केला होता, केस केली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, लोक माझ्या मुलाच्या वागण्यावरून आमच्याकडे

आर.सी.सी. २१७/२०२३
सरकार वि. गणेश व इतर.
**निशाणी २६**

तक्रार करत होते व त्याला कंटाळून माझ्या पतीने आरोपी विरूध्द सदरची खोटी केस दाखल केली. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींनी कधीही माझ्या मुलास काठीने मारहाण केली नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींनी मला व माझ्या पतीला कुठलाही दम दिला नाही. हे म्हणणे खरे नाही की, पतीच्या सांगण्यावरून मी आजरोजी खोटा जबाब देत आहे.

उलटतपास पुर्ण.
फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत,

ANANT RADHAKISHAN TENGSE
Digitally signed by ANANT RADHAKISHAN TENGSE
Date: 2025.10.16 14:59:24 +0530

दिनांक १६.१०.२०२५
अकोले

**( अनंत रा. टेंगसे )**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
कोर्ट नं. २, अकोले